
शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघाचे विद्वन्मान्यताप्राप्त त्रैमासिक

# शिविम संशोधन पत्रिका

(Peer Reviewed Referred Research Journal) ISSN No. 2319-6025
(विद्यापीठ अनुदान आयोग नवी दिल्ली मान्यता क्र. ६४१०१)
वर्ष दहावे : अंक पंचवीस - सव्वीसावा
जानेवारी-फेब्रुवारी-मार्च, एप्रिल-मे-जून २०२१

"ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यासाठी शिक्षण प्रसार" -
शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर संचलित
पद्मभूषण डॉ. वसंतरावदादा पाटील महाविद्यालय, तासगाव
• Accredited B++ with CGPA 2.76 by NAAC • ISO मानांकन 9001:2015 •
ता. तासगाव, जि. सांगली



# लोकसंस्कृतीची आविष्कार रूपे

Scanned by CamScanner

शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघाचे विद्वत्प्रमाणित त्रैमासिक

# शिविम संशोधन पत्रिका

(Peer Reviewed Referred Research Journal) ISSN No. 2319-6025

(विद्यापीठ अनुदान आयोग नवी दिल्ली मान्यता अ. क्र. ६४१७५)

वर्ष दहावे : अंक पंचवीस व सव्वीसावा

जानेवारी-फेब्रुवारी-मार्च, एप्रिल-मे-जून २०२१

# लोकसंस्कृतीची आविष्कार रुपे

● संपादक ●

प्रा.(डॉ.)शिवकुमार सोनाळकर

अध्यक्ष, शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ, कोल्हापूर

● अतिथी संपादक ●

डॉ.मिलिंद हुजरे

प्राचार्य, पद्मभूषण डॉ.वसंतरावदादा पाटील महाविद्यालय, तासगाव, जि.सांगली

डॉ.तातोबा बदामे　　　डॉ.शहाजी पाटील

● कार्यकारी संपादक ●

डॉ.नीला जोशी

● संपादक मंडळ ●

प्रा.(डॉ.)नंदकुमार मोरे　डॉ.गोमटेश्वर पाटील　डॉ. तातोबा बदमे　डॉ.दिनेश वाघुंबरे

● सल्लागार समिती ●

डॉ. राजन गवस　डॉ. प्रकाश कुंभार　डॉ. डी. ए. देसाई　डॉ. अनिल गवळी

● प्रकाशक ●

अध्यक्ष, शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ, कोल्हापूर

अनुराज, ७/ब सूर्यवंशी कॉलनी, सानेगुरुजी वसाहत, कोल्हापूर - ४१५ ०११

मुद्रक

देशमाने ऑफसेट,

औद्योगिक वसाहत, पलूस, (जि. सांगली) ४१६ ३१०, मो. ९९७०७००७५८

मूल्य: ₹ ३००

ही संशोधन पत्रिका प्रकाशक डॉ. शिवकुमार सोनाळकर, यांनी शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ, कोल्हापूर यासाठी देशमाने ऑफसेट, औद्योगिक वसाहत, पलूस येथे छापून अनुराज, ७/ब सूर्यवंशी कॉलनी, सानेगुरुजी वसाहत, कोल्हापूर - ४१५ ०११ येथे प्रकाशित केली. या प्रत्रिकेत प्रकट झालेल्या मतांशी संपादक, प्रकाशक, सल्लागार व मुद्रक सहमत असतीलच असे नाही.

Scanned by CamScanner

| | | |
|---|---|---|
| महाराष्ट्र लोकसाहित्यातील लोकगीतांच्या प्रभावाचा अभ्यास | सौ . साधना शिंदे | २८५ |
| लोकगीतातील स्त्रीरुपाचा आविष्कार | जयश्री शिंदे – गायकवाड | २८९ |
| कोकणातील शिमगोत्सव | डॉ. बाळासाहेब आण्णा सुतार | २९३ |
| लोकसाहित्यांतून दिसणारा धनगरी ओवीगीतांचा आविष्कार | डॉ.तानाजी ज्ञानदेव पाटील | २९७ |
| सावळजकरांची तमाशा परंपरा :एक आकलन | मच्छगंधाली नितीन तारळेकर | ३०१ |
| लोकसाहित्याच्या मौखिक आविष्काराचे रूप – श्रमगीते | डॉ. अशोक सदाशिव तवर | ३०६ |
| आदिवासी मावची बोलीतील उखाणे | कवित्रा सिपु वळवी | ३०९ |
| गोंड आदिवासींचे सण–उत्सव | सविता अशोक व्हटकर | ३१३ |
| गोमंतकीय लोकवेदातील विलोभनीय आविष्कार फुगडी गीते | विनय मडगावकर | ३१६ |
| प्रयोगरुप कला–गोंधळ | डॉ. विठ्ठल नामदेव रोटे | ३२१ |
| ललित साहित्यातील लोकसंस्द्धतीचे प्रतिबिंब | डॉ. सुलोचना बापू वाघमोडे | ३२५ |
| मिथक (पुराकथा) : संकल्पना व स्वरूप | डॉ. दिनेश पांडुरंग वाघुंबरे | ३२९ |
| शाहीर काशिनाथ बनसोडे : एक शोध | डॉ.सुभाष वाघमारे | ३३२ |
| 'आदिवासी लोककला आणि बोली यांचा अनुबंध' | डॉ. भीमराव खं. वानोळे | ३३७ |
| लोकसाहित्याचा मौखिक आविष्कार:लोककथा, लोकगीते | शितल शशिकांत कांबळे | ३४१ |
| गोव्यातल्या काणकोण तालुक्यातील वेळीप समाजाच्या लोककथांचा व लोकगीतांचा अभ्यास | जयेश गावकर | ३४५ |

 ISSN No. 2319-6025

Scanned by CamScanner

# सावळजकरांची तमाशा परंपरा : एक आकलन

मच्छगंधाली नितीन तारळेकर
श्री.आर.आर.पाटील महाविद्यालय,
सावळज,ता. तासगाव, जि. सांगली.

प्रस्तावना :

संभु कोष्ट्याचे शिष्यत्व स्वीकारलेल्या उमाजीने अध्यात्मिक विषयाचा अभ्यास केला. यामध्ये रामायण, महाभारत, पांडवप्रताप,गुरुमार्ग, भक्तीमार्ग यांचा समावेश होता.उमाजीनेआपला तमाशाफड इ.स.१८४०-४५ साली काढला. त्यांचा मुलगा तात्या सावळजकर याने तो पुढे सुरु ठेवला.त्या बरोबरच उमाजी बाबाजी सावळकर यांचा नातू शंकराव कांबळे-सावळकर यानेही हीपरंपरा सुरु ठेवली. इ.स.१९९० पर्यंत अतिशय जोमाने चालूठेवली.तमाशामध्ये आध्यात्मिक,शृंगार व सामाजिक विषय आणले.त्या सावळजकरांची माहिती पुढीलप्रमाणे थोडक्यात पाहू :-

**१.उमाजी बाबाजी सावळजकर :-**

पूर्वीच्या काळी कलावंताचा नावाच्या पुढे त्यांच्या जातीचा उल्लेख केलेला असावयाचा .त्याचप्रमाणे उमाजींच्या नावापुढे मांग शब्द होता. कारण मांग समाजातील उमाजीने तमाशा या लोककलेत आपले आयुष्य वाहून घेतलेले होते.त्याचे वडील चोर-दरोडेखोर होते. त्यांच्यामुलाने उमाजीने आपल्या कलेच्या जोरावर हा शिक्का खोडून काढला. अवघ्या दहा-बारा वर्षाच्या उमाजीने शेतावर चाकरीला असताना संभु-राजू भिलवडीकर यांच्या बरोबरीने गाणे गायले. तरुण वयात म्हणजेच तीस-पस्तीस वर्षात उमाजीने स्वत:चा तमाशा फडकाढला. सांगलीत इ.स.१८५० च्यादरम्यान हा तमाशा फड काढला. यातमाशा फडामध्ये सांगलीचा तुका तोड, मिरजेचा बंगलु (ढोल्या) बुधगाव तात्या( नाच्या) पेडचा बाबाजी सिद्धू साठेहे होते. बाबाजींची सासरवाडी सावळज होती. बाबाजींच्या साथीनेच उमाजिंची कविता बहरली. बाबाजी यांचे गुरु मोराळचे नाना रामचंद्र पाटील होते.त्यांनी उमा-बाबू यांच्या छेलबटाव- मोहना राणीची कथा सांगितली. या कथेतून मोहना-बटाव या वगाची निर्मिती झाली .इ.स.१८५०-६० च्या दरम्यानरचली. हाच मराठीतील पहिला वग समजला जातो.विविध ठिकाणी उमा -बाबूयांनी आपल्या तमाशाचे खेळ सांगली परिसरात केले.७-८वर्षे उमाजींचा तमाशाच खेळ होते. सासरवाडी कोल्हापूर ,जिल्ह्यातील कागल होती.तेथील एन गैबीच्याउरुसात उमाजीने 'मोहना- बटाव' वगसादर केला. त्याचबरोबर कोल्हापूर, इचलकरंजी , कुरुंदवाड येथे तमाशाचे खेळ केले. तात्या(नाच्या) यांच्या आग्रहामुळे त्यांनी बुधगावच्या जत्रेत 'राजा हरिश्चंद्राचा वग' सादर केला. बाबाजी पेडकर यांच्या ओळखीने कराड ,वाई, सातारा, पाटणखोरे या परिसरातही उमाजीने तमाशाचे खेळ केले. उमाजीने सांगली -कागल- नांदणी असे वास्तव्य करत शेवटी त्याने तमाशा बंद केला. व सावळज येथे स्थायिक झाले.वयाच्या ७५ व्यावर्षी म्हणजेच इ.स. १९१० साली उमा बाबाजी सावळकरयांचा मृत्यू झाला.



Scanned by CamScanner

## २. तातोबा (तात्या) सावळजकर :-

उमाजींचा मुलगा तात्या हा कागलमध्ये लहानाचा मोठा झाला. अवघ्या दहा-बारा वर्षाचा असताना तात्या उत्तम प्रकारे ढोलकी वाजवत होता. त्याच बरोबर त्याला गाणे गाण्याचा छंद होता. इयत्ता ६वी पर्यंतचे प्राथमिक शिक्षण घेऊन त्याने शाळा सोडली .पुढे तो उमाजीन बरोबर तमाशात ढोलकी वाजवण्याचे काम करू लागला.शीघ्र कवित्व हे त्याला लाभलेले वरदान होते. तमाशाच्या खेळात उमाजी हलगी वाजवायचा तर तात्या ढोलकीवाजवत होता. सांगली जिल्ह्यातील सावळज गावात सिद्धेश्वराच्या यात्रेनिमित्त श्रावण महिन्यात शेवटच्या शनिवारी ग्रामदैवत प्रसिद्ध मारुतीरायाचे मोठीयात्रा भरते. या यात्रेत उमाजीने गावच्या मध्यभागी असलेल्या चावडी पुढच्या वडाखाली तमाशाचा खेळ ठेवला होता. हा खेळ बघत असताना लोकांनीबाप-लेकाचे कौतुक केले .या दरम्यान तात्याचा ताल चुकला आणि रंगाचा बेरंग झाला. तेव्हा उमाजीने रागाच्याभरात स्टेजवरच तरुण तात्याच्या थोबाडीतमारली. त्याच वेळी तात्या उमाजीला म्हणाला,'आबा मला मारलं तुझ्या सवाई तमाशा उभा करेल तेव्हाच मी सावळजला तोंड दाखविण' एवढे बोलूनतात्या निघाला.तोचोकाक गावच्या रामाच्या तमाशात सामील झाला .शिकलेले तात्याने थोड्याच दिवसात स्वतःचा तमाशा काढण्याचे ठरवले.तात्यानेअनेक धार्मिक ग्रंथ, पोथ्या, पुराणे भर्तुहरीचे नीतिशास्त्र या ग्रंथांचे वाचन केले .तो स्वतः रचना तयार करू लागला.

लावणी, छकडी ,साकी, वग अशी अनेक पदे रचूनस्वतः गाऊ लागला.आपल्या आवाजाने प्रेक्षकांना भुरळ घातली. प्रसिद्ध शाहीरपठ्ठे बापूराव यांच्याशीसवाल-जवाबस्पर्धा करुन यशस्वी झाले. ते तात्या सावळजकर हा एकमेव असा तमासगीर होता. तात्यांनी परंपरेने चालत आलेल्यातमाशामध्ये शृंगार व अध्यात्म यांची भर घातली. समाजाला नैतिक शिक्षण देणे व ढोंगीपणावर हल्ला करून समाजाला चांगल्या विचारांच्याकडे नेण्याचेकाम तात्या सावरकरांनी केले.तात्यांच्या तमाशा फडत मिरजचा अप्पा, कवलापूरचा विठू व बामणीचा लिंगाप्पा हे होते.चिंचवडच्या जत्रेत एका पार्टीने उमाजींचा व दुसऱ्या पार्टीने तात्यांचा तमाशा ठरवला होता .त्यावेळी तमाशाच्याबोर्डावर एकत्र आल्यावर उमाजींनी जुन्याच रचना सादर केल्या. पण लोकांना तेच तेच ऐकून कंटाळा आला होता. काहीतरी नवीन ऐकता यावे अशीलोकांची अपेक्षा होती. ती पूर्ण करण्याचा प्रयत्न तात्यांनी संस्कृत श्लोकांची उदाहरणे व रचना सादर करून पूर्ण केली. त्यावेळी तमाशाच्या बोर्डावरउमाजीने मुलाचे कौतुक केले. स्वतः आपला डफ फोडला व इथून पुढे तमाशा करणार नाही ही शपथ घेतली. अनेक ठिकाणी तमाशाचा खेळ करूनतात्यांनी सावळज गावातील वडिलोपार्जित शेतजमिनी बरोबरच तासगावमध्ये ६५ एकर जमीन घेतली .पण ती त्यांच्या भावाने बळकावली. शेवटीतात्याला अन्न पाण्याला पैसा नव्हता .म्हणून ते मिरजेला आपल्या मुलाकडे म्हणजेच शंकराव कांबळे- सावळजकर यांच्याकडे गेले. हळूहळू त्यांच्याएकेक साथीदाराचे निधन झाले. यात तात्या -आप्पाची जोडी फुटली. तसेच त्यांचे मानसिक संतुलन बिघडले व त्यातून ते बाहेर पडले नाहीत. वयाच्या ८० व्या वर्षी त्यांचे निधन झाले.


ISSN No. 2319-6025

Scanned by CamScanner

३. शंकरराव कांबळे-सावळजकर :-

हे प्रसिद्ध तमासगीर उमाजी बाबाजी सावळजकर यांचे नातू व तात्या सावरकर यांचे पुत्र होते. सावरकरांच्यातमाशा परंपरेतील शेवटचे तमासगीर म्हणजेच शंकर तात्या होय. शंकरराव यांच्या जन्माची हकीकत सांगितली जाते. ती आशी तात्यांचे लग्न होऊन १६वर्ष झाली. तरी त्यांना मूल झाले नाही. तात्या हे उमाजींच्या जवळ सावळजला राहात होते. उमाजीने त्यांच्या मृत्यूचा समयी त्यांची पत्नीशांताबाई हीला जवळ बोलावले आणि सांगितले 'मी तुझ्या पोटी जन्म घेईल तू वांझोटी राहणार नाहीत' त्यानंतर हिंदू प्रथेप्रमाणे तिसऱ्या दिवशीपीठ- गुलालावर शंकराच्या पिंडीचा आकार दिसला .पुढे तात्याला मुलगा झाला .त्याचे नाव शंकर ठेवले. तोच हा तात्या सावळजकर यांचा मुलगाशंकर कांबळे -सावळकर. यांनी इयत्ता ४थी पास केली आणि तमाशात काम करू लागले.काही दिवस काम केल्यानंतर त्यांचे मन तमाशात रमेना .म्हणून पुन्हा त्यांनी शाळेत जायचे ठरवले .इयत्ता ७ वी पर्यंतचे शिक्षण घेऊन कायमची शाळा सोडली. तमाशात काम करण्यास सुरुवात केली.

शंकरराव सावळजकरांनी स्वतःचा तमाशाचा फड इ.स.१९३५ साली काढला. तात्यांच्या हयातीत काढला.शंकररावांच्या फडामध्ये नाच्याचे काम करणारा गणपत हा हातनूरचा होता. तिसंगीचा चंदर सोंगाड्या होता व भीमराव हे साथीदार शंकररावांचा फडातहोते.आठ वर्ष तमाशाचा फडचालवला आणि बत्तीस शिराळा येथे शेवटचा खेळ करूनतमाशा बंद केला. त्यानंतर त्यांनी पोस्टमनची नोकरी केली.किर्लोस्करवाडी येथे होते .त्याच दरम्यान त्यांची ओळख साहित्यिकांची झाली. त्यांचा सहवास त्यांना लाभला त्यामध्ये ना.धो. ताम्हणकर, शंकररावकिर्लोस्कर यांचा समावेश होता. त्यांना साहित्याची आवड निर्माण झाली.शृंगार प्रधान रचना सोडून ते सामाजिक विषयावर प्रकाश टाकणारे साहित्य

लिहू लागले. शंकररावांनी 'अभिनव' मासिकात 'डफ-तुणतुणे' नावाचे सदर लिहिले .तसेच अंधारातील देशभक्त, तलवारीचे तुणतुणे, ' नाना फाकड्या'या कादंबऱ्यांचे लेखन केले आहे. यापैकी 'नाना फाकड्या' या कादंबरीचे हस्तलिखिते उपलब्ध आहेत. शंकररावांनी 'मानाचा मुजरा' या नावाची चित्रपटकथा लिहिली आहे .ही कथा उमाजी सावळजकर आणि वडील तात्या सावळजकर यांच्या जीवनात घडलेल्या ठरावीक घटना प्रसंगांवर आधारित आहे.त्याचबरोबर परंपरेने चालत आलेल्या वग आणि इतर रचना हे साहित्य जपून ठेवण्याचे काम व मौखिक परंपरेने आलेले वडिलोपार्जित साहित्य जतनकरून ठेवण्याचे महत्त्वाचे काम शंकररावांनी केलेले आहे .शंकरराव कांबळे-सावळजकर यांनी तमाशामध्ये दिलेले योगदान हे अत्यंत महत्त्वाचे आहे. त्यांच्या मागे मोठा मुलगा वसंत नाही नायजेरियात इंग्रजी विषयाचा प्राध्यापक होता. तर छोटा मुलगा शांतवन अकाली मृत्यू पावला होता. सरतेशेवटीतेमुलीच्या घरी होते. मिरज येथे ४ मार्च १९९० साली त्यांचे निधन झाले. त्यांच्या निधना बरोबरचसावळजकरांची तमाशा परंपरा संपुष्टात आली.



ISSN No. 2319-6025

Scanned by CamScanner

**सावळजकरांचे लोकनाट्यातील योगदान:-**

उमाजी बाबाजी सावळकर यांनी मराठीतील पहिला वग तयार केला. हा वग म्हणजेच तमाशा लोककलेतीलमहत्त्वाचा प्रकार होय.

वगाची व्याख्या :-

महादेव शास्त्री जोशी :- 'तमाशातील रंगातील कथानाट्य.'प्रा. विश्वनाथ शिंदे :- ' परंपरेने चालत आलेल्या कथानकावर बेतलेले सरदार-सोंगाड्या इत्यादी तमाशातील पात्रांच्या आधारेतमाशाच्या बोर्डावर उस्फुर्त संवादातून सादर केले जाणारे नाटक म्हणजे 'वग' होय.पारंपारिक तमाशात वगाचे अनेक प्रकार पडलेले पहावयास मिळतात. त्यामध्ये पौराणिक , ऐतिहासिक, लोककथात्मक व सामाजिक विषयावरील वग आहेत. लोककथात्मक वग या प्रकारात मोडणारा तमाशातील वग हा सर्वप्रथम उमा-बाबू यांनी सादर केला. तो म्हणजे 'मोहना-बटाव' होय. याबरोबर 'चंद्र भानू राजाचा वग', 'गवळ्याची रंभा', 'गाढवाचे लग्न' हे वगसादर केलेले आहेत.इ.स.१८५०-६० च्यादरम्यानच्या काळात या वगाची रचना केली असावी असे नामदेव व्हटकर यांनी सांगितले आहे. हाच उपलब्ध असणारावगखालील प्रमाणे :-

मोहना नारीचा स्वरूप अनिवार तनु सुकुमार।
आलाय भार खाशी दिसण्यात उमेतवार।
फिरविती हात छातीवर,भुवया दोन्ही चंद्राची कोर।
तुटली तार बावरी हरिण डोळ टवकार चमकली वीज आस्मानावर।
बारीक पुतळी पट्ट्याची धार ।
मंजुळ बोलणं चालणं स्थिर । पहात जग सारं।
अहमदनगरचा मोहना नारीला।
स्वरूपाची आवई गेली दूरवर ।
चोहो देशावर, घोर कैकाला ।।१ ।।

हा तमाशा इतिहासातील पहिला वग आहे असे नमूद केलेले आहे. लोककथात्मक वगात कथात्मकलावण्या भेदिक कलगीतुराच्या फडात गाऊन म्हटल्या जात त्याला 'ऐकीव' असे म्हणतात .अशा प्रकारची भेदिक फडातील लावणी म्हणजे'मोहना-बटाव' होती. या वगात अहमदनगरची मोहना राणी व दिल्ली शहराचा बटाव यांची प्रेम कथा आहे .ही प्रेम कथा शोकात्मक आहे. हा वग'छेल बटाव मोहनाराणी' या नावाने प्रसिद्ध आहे.सावळज श्री सिद्धेश्वरवाडी येथील श्री बापूराव शिरढोनकर आणि चंदर दहिवडीकरव शंकर तिसंगीकरच्यासह ' राजा हरिश्चंद्राचा वग' सादर केला. या वगापासून उमा- बाबूंनी पौराणिक विषयांवरील वगाची परंपरा सुरू केली. हा वगग्रामीण भागातील
लोकांना खूप आवडला. तो पुढीलप्रमाणे:-

हरिश्चंद्र राजा तारामती होते दोघेजण।
सत्य एक नेमाने, बघा ते मोठे पुण्यवान ।।१।।
कोट्यान कोटी पुण्य केले त्या हरिश्चंद्र राजानं।
भुकेल्याची भूक जाणली तारामतीनं ।।२।।


ISSN No. 2319-6025

Scanned by CamScanner

तेहतीस कोटी देवाला सांगितली खूण,त्या गुरुवशिष्ठान।
हरिश्चंद्र सारखा राजा पुण्यवान नाही कोण।।३।।

श्रीमंत सावकार बाळकराम भोळा,सालस होता .आणि त्याची पत्नी व्यभिचारी,चाणाक्ष, धूर्त ,कृतघ्न होती.या विरुद्ध स्वभावाची जोडी या वगात पहावयास मिळते .तसेच पुण्यात किती आहे. हे समजले पण स्त्रीस्वभावाचा अंत कुठे होईल हे लक्षात येणार नाही.या जोडीतील संघर्ष नाट्यमय रूपात तात्यांनी या वगात मांडला आहे. सावळजकरांच्या तिसऱ्या पिढीतील तमासगीर शंकरराव तात्या कांबळे-सावळजकर हे होते .त्यांनी साध्या सोप्या भाषेत प्रेक्षकांना समजेल अशी रचना तयार केल्या. त्यात साकी, दंडी , भक्ती गीते, पोवाडे यांचा समावेश होतो.गांधींच्या खुनानंतर 'स्वातंत्र्याचा जनक हरपला'हे काव्य रचले .किर्लोस्करांचा पोवाडा, पोव तमाशाच्या माध्यमातून सामाजिक विषय लोकांसमोरठेवण्याचे महत्वाचे काम शंकरराव सावळजकरांनी केलेले आहे. भावनाप्रधान वगाची निर्मिती केली.'राष्ट्राकरिता पोराला मारला' हा वगप्रसिद्धआहे .कादंबरी, चित्रपट कथा असे लेखन यांनी केले आहे. उत्कृष्ट गण,गवळण व वग लेखन या दोन्ही प्रकारात त्यांना प्रसिद्ध अभिनेते श्री. दादा कोंडकेयांच्या हस्ते तमाशा कला व कलावंत विकास मंदिर ,मुंबई .यांच्यावतीने देण्यात आलेले तमाशा साहित्य निर्मितीचे प्रथम क्रमांकाचे क्रमांकाचा पुरस्कारत्यांना लाभला .असा प्रकारे सांगली जिल्ह्यातील सावळज गावचे हे तीन पिढ्यातील दिग्गज कलावंत ओळखले जात होते. ते त्यांच्या तमाशा लोककलाप्रकारातील योगदानामुळे आणि त्यांनी रचलेल्या या प्रकारामुळे सावळजकरांनी संपूर्ण महाराष्ट्राला सावळत गावाचा नाव परिचय करून दिला.

**समारोप :-**

जातिभेदाच्या काळात आपली जात मागे टाकून कलेच्या जोरावर त्यांनी नाव ,प्रतिष्ठान मिळवली ते म्हणजेच उमा(मांग),तात्या(मान) आणि शंकर कांबळे सावळजकर होय .गुन्हेगारी शिक्का खोडून काढून उभ्या महाराष्ट्राला आपल्या लोककलेतून मोहहुन टाकण्याचे कामसावळजकरांच्या तीन पिढ्यांनी केलेले पहावयास मिळते. तमाशा या लोककलेत उमाजींनी वग आणला. पूर्वीपासून चालत आलेल्या तमाशामध्येअध्यात्माची जोड तातोबा सावळजकर यांनी दिली .तर सामाजिक विषयांवर रचना करून जनजागृती करण्याचे काम शंकरराव कांबळे सावळजकरांनीकेलेले दिसते.तसेच तमाशा वागण्यात व लोककलेच सावरकरांचा तमाशाने मौलिक भर घातलेली पहावयास मिळते.

**संदर्भ ग्रंथ :-**

महादेव शास्त्री जोशी :- संस्कृती कोश
प्रा. शिंदे विश्वनाथ :- सावळजकरांचा तमाशा,संस्कृती प्रकाशन, पुणे प्र.आ. एप्रिल २०१३
कस्तुरे बाळासो गुरुजी :- आद्य तमासगीर उमाजी बाबाजी सावळकर यांचे वग, क्रांतदर्शी प्रकाशन, इस्लामपूर ,जि-सांगली.प्र.आ.- ८ एप्रिल २०१६



Scanned by CamScanner